# रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन अधिकारी, सामान्य राज्य सेवा, गट-ब चाळणी परीक्षा अभ्यासक्रम

---

## सामान्य ज्ञान, बुध्दिमापन चाचणी या विषयामध्ये खालील घटकांचा समावेश असेल

**दर्जा :** पदवी **प्रश्न / गुण :** १५०

**माध्यम :** इंग्रजी व मराठी **कालावधी :** दीड तास

**प्रश्नपत्रिकेचे स्वरुप :** वस्तुनिष्ठ बहुपर्यायी

---

(१) **चालू घडामोडी** :- जागतिक तसेच भारतातील.

(२) **बुध्दिमत्ता चाचणी** :- अंकगणित, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, सरासरी, दशांश व अपूर्णांक, तसेच बुध्दयांक मापनाशी संबंधीत प्रश्न.

(३) **महाराष्ट्राचा भूगोल** :- महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical)भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, Climate, पर्जन्यमान व तापमान, पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत व डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती- वने व खनिजे, मानवी व सामाजिक भूगोल- लोकसंख्या (Population), migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्टया व त्यांचे प्रश्न.

(४) **माहितीचा अधिकार कायदा - २००५**

(५) **महाराष्ट्राचा इतिहास** :- सामाजिक व आर्थिक जागृती (१८८५-१९४७), महत्वाच्या व्यक्तींचे काम स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम / भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी (सत्यशोधक समाज, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ, हिंदू महासभा, मुस्लीम लीग, राष्ट्रीय क्रांती चळवळ, डावी विचारसरणी / कम्युनिष्ट चळवळ, शेतकरी चळवळ, आदिवासींचा उठाव.)

(६) **भारतीय राज्यघटना** :- घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्टये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे-शिक्षण, युनीफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका, राज्यपाल, मुख्यमंत्री व मंत्रीमंडळ-Role, अधिकार व कार्य, राज्य विधीमंडळ- विधानसभा, विधानपरिषद व त्यांचे सदस्य, अधिकार, कार्य व Role, विधी समित्या.

(७) **संगणक व माहिती तंत्रज्ञान** :- आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळया क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलोजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नविन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळया सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी, माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न व त्याचे भवितव्य.

(८) **मानवी हक्क व जबाबदाऱ्या** :- संकल्पना - आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदाऱ्या यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरीबी, निरक्षता, बेकारी, सामाजिक-सांस्कृतिक - धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण नियम २००५, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम १९८९, हुंडाबंदी अधिनियम १९६१, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान.